अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.अतिमआ/साप्रवि/१७८८
दिनांक : २०|०६|२०२०

-: आदेश :-

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून सदर विषाणूच्या प्रतिबंधासाठी पुणे महानगरपालिका प्रशासनातर्फे विविध उपाय योजना केल्या जात आहेत.

पुणे महानगरपालिकेतील कामकाजात विविध कार्यालयातील कर्मचारी , नागरिक तसेच माननीय सदस्य यांना कामकाजानिमित्त यावे लागते. अशा परिस्थितीत प्रत्येकाने स्वतःची व अन्य व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

तरी, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात बाहेरून येणारे सर्व कर्मचारी यांची नोंद (नाव, पत्ता व मोबईल क्रमांक, येण्याचा व जाण्याचा वेळ) या स्वरूपात नोंद रजिस्टरमध्ये करणे आवश्यक आहे याची सर्व खात्यांनी दक्षता घेऊन अंमलबजावणी करावी. तसेच नगर सचिव यांनी पुणे महानगरपालिकेतील सर्व मा.पदाधिकारी यांच्या दालनात असे नोंद रजिस्टर ठेवून त्यात नोंदी घेतल्या जातील याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

Rubal
२०/६/२०२०
(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :-
मा.महापालिका आयुक्त
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/इ)

प्रती,
सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका